ePaper

## शी जिनपिंग भारतात येणार! ब्रिक्स परिषदेसाठी दिल्ली दौऱ्यावर



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 11 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

स्मार्ट शाळांचा दावा फोल; २२ शाळांना मैदानच नाही!

### मनोज जरांगे पाटील ठाम; आरपारच्या आंदोलनाची दिशा स्पष्ट करणार

# मुंबईत जाणारच!



**महाईन्यूज । वडीगोद्री (जि. जालना)**

**मराठा आरक्षणाच्या हक्काच्या अंमलबजावणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा गुरुवारी (दि. १०) तेरावा दिवस उजाडला. प्रकृती स्थिर असली तरी अशक्तपणा जाणवत आहे. मात्र, आंदोलनाच्या भूमिकेवर ते ठाम असून सरकारने शिष्टमंडळ पाठवायचे असेल तर पाठवावे, आपण कोणाचीही वाट पाहत बसणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ठरल्याप्रमाणे मुंबईकडे जाणार असून १२ सप्टेंबरला आंदोलनाची पुढील 'आरपार'ची दिशा जाहीर करणार, असा इशारा त्यांनी दिला.**

पोळा सणानिमित्त राज्यातील शेतकरी आणि समाजबांधवांना शुभेच्छा देताना जरांगे यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी सण उत्साहात साजरा करावा, असे आवाहन केले. आंदोलन सुरू असले तरी बळीराजाचा सण परंपरेनुसार साजरा करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी जेवणासाठी दिलेल्या निमंत्रणावरही जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. निमंत्रणाबद्दल आभार मानत भाऊबीजेच्या दिवशी बहिणीकडे साडी-चोळी घेऊन नक्की जाईन, असे सांगितले. मात्र, सध्या आपण हक्काच्या लढाईत असल्याचे सांगत 'शिकारीच्या वेळेला जेवायची सवड नसते', असे भावनिक उत्तर त्यांनी दिले. समाजाचे भवितव्य पणाला लागले असल्याने आंदोलनाच्या बाजूने मायेची भावना ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, १० ते १७ सप्टेंबरदरम्यान गावोगावी सुरू असलेल्या जात प्रमाणपत्र शिबिरांच्या हेतूवरही जरांगे यांनी संशय व्यक्त केला. आंदोलन थांबवण्यासाठी ही शिबिरे सुरू केली आहेत की मिळालेली प्रमाणपत्रे नंतर रद्द करण्याच्या हेतूने त्यांचे आयोजन केले आहे, यावर लक्ष ठेवत असल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलकांवर गुन्हे दाखल झाले तरी समाजाने घाबरून मागे हटू नये, असे आवाहन त्यांनी केले.

आपल्या आक्रमक भाषेवर टीका करणाऱ्या सत्ताधाऱ्यांवरही जरांगे यांनी निशाणा साधला. मंत्री संजय शिरसाट यांच्या चुकीच्या मध्यस्थीमुळे एकनाथ शिंदे आणि आपले संबंध खराब झाल्याचा आरोप त्यांनी केला. "मी सरकारला नाही, तर अन्याय करणाऱ्या व्यक्तींना बोललो आहे," असे स्पष्ट करत मराठ्यांच्या हक्कासाठी कोणत्याही दबावाला बळी पडणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांच्या भूमिकेवरही जरांगे यांनी तीव्र आक्षेप घेतला. ५० टक्क्यांवरील आरक्षण आणि १९९४ मध्ये दिलेल्या आरक्षणाबाबत तायवाडे यांनी जाहीर भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. मराठा आरक्षणाच्या मागणीवर आंदोलन अधिक तीव्र करण्याचे संकेत देत जरांगे यांनी आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली.

### 'शिकारीच्या वेळेला जेवणाची वेळ नाही'; अमृता फडणवीसांना उत्तर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी जेवणासाठी दिलेल्या निमंत्रणावर बोलताना जरांगे पाटील अत्यंत भावूक झाले. "ताईंनी जेवणाचे निमंत्रण दिले आहे, त्याबद्दल धन्यवाद. भाऊबीजेच्या सणाला मी स्वतः साडी-चोळी घेऊन बहिणीकडे नक्की जाईन. परंतु, सध्या मी हक्काच्या लढाईच्या मैदानात उतरलो आहे. शिकारीच्या वेळेला जेवायची सवड नसते. आज त्यांचा हा भाऊ संकटात असून संपूर्ण समाजाचे भवितव्य पणाला लागले आहे; त्यामुळे बहिणीने मायेची भावना आंदोलनाच्या बाजूने ठेवावी," असे जरांगे म्हणाले.



### जशी प्रवृत्ती तशी भाषा

"मी सरकारला नाही, तर अन्याय करणाऱ्या व्यक्तींना बोललो आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मराठ्यांची फसवणूक केली तर मी गप्प बसणार नाही. मी कोणत्याही पक्षाचा नाही, केवळ माझ्या मराठा जातीच्या बाजूने बोलणार आहे."

### जात प्रमाणपत्र शिबिरांच्या हेतूवर संशय

शासनाने १० ते १७ सप्टेंबर दरम्यान गावोगावी सुरू केलेल्या दाखले वाटप शिबिरांवर टीका करताना ते म्हणाले, "ही शिबिरे केवळ सध्या सुरू असलेले आंदोलन थांबवण्यासाठी आहेत की मिळालेली प्रमाणपत्रे नंतर रद्द करण्याच्या कुटील सल्ल्याने आयोजित केली आहेत, हे आम्ही बारकाईने पाहत आहोत." आंदोलकांवर ठिकठिकाणी दाखल होणाऱ्या गुन्ह्यांवर बोलताना त्यांनी समाजाला धीर दिला. "आपल्या हक्काचे आरक्षण आपल्याला सहजासहजी मिळत नाही, त्यासाठी सरकार जाणूनबुजून गुन्हे दाखल करेल. मात्र समाजाने हे सहन करून मागे न हटता ठाम राहावे," असे आवाहन त्यांनी केले.

# गणेशोत्सवासाठी मेट्रोकडून नवे वेळापत्रक

## खोदाई शुल्काचा पैसा जातो कुठे? निकृष्ट रस्ते दुरुस्तीविरोधात वेलणकर आक्रमक

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी पुणे मेट्रोकडून मेट्रो फेऱ्या आणि सेवेच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या काळात संपूर्ण मेट्रो मार्गावर गर्दीच्या वेळी दर ५ मिनिटांच्या अंतराने मेट्रो धावणार आहे.**



गणेशोत्सवकाळात मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकात येऊन मार्गिका बदलणे टाळावे. स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड या मार्गिका १ वरून मध्यवर्ती पेठांमध्ये येणाऱ्या प्रवाशांनी कसबा पेठ मेट्रो स्थानकाचा वापर करावा. वनाजच्या बाजूने येणाऱ्या प्रवाशांनी डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकावर, तर रामवाडीच्या बाजूने येणाऱ्या प्रवाशांनी पुणे महानगरपालिका (पीएमसी) मेट्रो स्थानकाचा वापर करावा. या कालावधीत गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी केवळ परतीच्या प्रवासासाठीच महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकाचा वापर करावा, असे आवाहन ‘महामेट्रो’कडून करण्यात आले आहे.

गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानक एकदिशात्मक स्वरुपात कार्य करेल. त्यानुसार लोकमान्य टिळक पुतळा येथील द्वार क्रमांक ३ हे केवळ स्थानकात प्रवेश करण्यासाठी खुले असेल, तर छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील द्वार क्रमांक २ हे प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी उपलब्ध असेल, असेही ‘महामेट्रो’कडून कळविण्यात आले आहे.

पुण्यातील गणेशोत्सव पाहण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून लाखो गणेश भक्त शहरात येतात. या पार्श्वभूमीवर १४ ते १६ सप्टेंबरदरम्यान सकाळी ६ ते रात्री ११ या नियमित वेळेत मेट्रो सेवा सुरू राहणार आहे. तसेच १७ ते २४ सप्टेंबरदरम्यान मेट्रो सेवा सकाळी ६ ते रात्री २ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी २५ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता सुरू झालेली सेवा २६ सप्टेंबरच्या रात्री ११ वाजेपर्यंत सलग ४१ तास सुरू राहणार आहे. त्यानंतर २७ सप्टेंबरपासून मेट्रो पुन्हा सकाळी ६ ते रात्री ११ या नियमित वेळेनुसार सुरू राहणार आहे. उत्सवाच्या काळात गर्दीच्या वेळेत प्रवाशांच्या सोयीसाठी मेट्रोच्या फेऱ्या वाढविण्यात येणार असून, पीक अवर्समध्ये दर पाच मिनिटांनी मेट्रो उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गणपती दर्शनासाठी पिंपरी-चिंचवडहून स्वारगेटमार्गे येणाऱ्या भाविकांनी कसबा पेठ स्थानकाचा, तर वनाजकडून येणाऱ्या प्रवाशांनी डेक्कन जिमखाना स्थानकाचा वापर करावा. रामवाडीहून येणाऱ्या प्रवाशांनी पुणे मनपा स्थानकावर उतरावे, सर्वच प्रवाशांनी महात्मा फुले मंडई स्थानकावर उतरून गर्दी करू नये, असे आवाहन मेट्रो प्रशासनाने केले आहे.

### गणेशोत्सवातील मेट्रोचे वेळापत्रक

- १४ ते १६ सप्टेंबर – सकाळी ६ ते ११ (नियमित)
- १७ ते २४ सप्टेंबर – सकाळी ६ ते पहाटे २
- २५ सप्टेंबर (अनंत चतुर्दशी) – सकाळी ६ ते २६ सप्टेंबर रात्री ११
- २७ सप्टेंबरपासून – सकाळी ६ ते रात्री ११ (नियमित)
- उत्सवकाळात सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ४ ते रात्री ८
- या वेळेत दर ५ मिनिटांनी मेट्रो धावणार आहे.

# पुण्यात गणरायाच्या स्वागतासाठी ‘एआय’ची साथ; ‘एआय’ ठरवतंय लूक





**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सवाचे वेध लागताच सजावटीचे साहित्य, अलंकार-दागिने, देखाव्यांसाठी आणि वेगवेगळ्या प्रकारच्या गणेशमूर्ती खरेदीसाठी बाजारात लगबग वाढते. यंदा गणरायाच्या आगमनापूर्वी मूर्ती, त्यावरील पोशाख, दागिने आणि सजावटीच्या साहित्य निवडीसाठी ‘एआय’ची मदत घेण्यात येत आहेत. घरातील गणेशोत्सवासाठी थीम निवडून त्याआधारे बाजारातील गणेशमूर्तींचे नियोजन केले जात आहे.**

आवडलेल्या गणेशमूर्तीवर कोणती वस्त्रे शोभून दिसतील, कोणती पगडी उठून दिसेल, त्यांची रंगसंगती ते सजावटीसाठी काय करता येईल इत्यादी गोष्टींसाठी नागरिक थेट ‘एआय’ची मदत घेत आहेत.

मूर्तीचा फोटो किंवा सजावटीच्या कल्पनांची माहिती ‘एआय’ला दिली जाते. त्यानुसार कोणत्या प्रकारचे साहित्य निवडायचे, पोशाख-दागिन्यांचे वेगवेगळे प्रकार मूर्तीवर कसे दिसतील, हे पाहिले जाते. त्यानुसार ‘एआय’ने बनवलेले छायाचित्र बाजारात दाखवून वेगवेगळ्या वस्तूंची मागणी करण्यात येत असल्याची माहिती बाजारातील विक्रेत्यांनी दिली. ग्राहकांकडून पारंपारिक वस्तू-साहित्यालाच पसंती देण्यात असल्याचेही त्यांनी नमूद केले. कसबा पेठेतील व्यावसायिक आनंद महाडिक म्हणाले, ‘आता ‘एआय’चा काळ आहे.

नागरिक आपल्या गणेशमूर्तीचे छायाचित्र ‘एआय’ला देतात. मूर्तीला कुठली ड्रेपरी, फेटा किंवा रंगसंगती शोभून दिसेल, ते विचारतात. त्यानुसार ‘एआय’ने सुचवलेले छायाचित्र आणि डिझाईन घेऊन ग्राहक त्याच प्रकारचे फेटे-धोतर बनवून देण्याची मागणी करतात.’ ‘ग्राहकांकडून पारंपरिक पोशाखांचीच मागणी केली जाते. आमच्याकडून गणेशमूर्तीचा आकार, बैठक आणि प्रकारांनुसार त्यांना वेगवेगळे पर्याय सुचवले जातात किंवा त्यांनी दाखवलेल्या छायाचित्रातील पोशाख-सजावटीबद्दल मार्गदर्शन केले जाते. यंदा अनेक ग्राहकांकडून कृष्ण पगडीची मोठी मागणी करण्यात येत आहे. मूर्ती रूबाबदार दिसण्याकडे अनेकांचा कल आहे,’ असेही महाडिक यांनी सांगितले.

मूर्तीच्या सजावटीबरोबरच नागरिकांकडून देखाव्यांची मोठी मागणी करण्यात येत आहे. गेल्या २५-३० वर्षांपासून नरेश वूड आर्टिकल्सच्या माध्यमातून पुण्यात देखाव्यांसाठी लाकडावरील नक्षीकामाचा व्यवसाय करणारे नरेश बडाई म्हणाले, ‘यंदा प्लायवूडवरील नक्षीकामाला मोठा मागणी आहे. अनेकजण ‘एआय’ने बनवलेली छायाचित्रे दाखवतात. पण, नेहमीच्या सिंहासन, शंकर, हनुमान किंवा पांडुरंग आदी नक्षीकामांना मागणी आहे. त्याबरोबर अष्टविनायक संकल्पनेतील वूडन आर्टिकल्स आणि डिझाईन्सना ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात पसंती देण्यात येत आहे.’

दरम्यान, ‘ग्राहक आपल्या आवडीनुसार ‘एआय’ तंत्रज्ञान अथवा नव्या डिझाईन्सचा वापर करत असले, तरी उत्सवाचे मूळ स्वरूप, आस्था आणि पारंपरिकता कायम ठेवण्यासाठी ग्राहक आणि विक्रेत्यांकडूनही प्रयत्न करण्यात येत आहे. गणेशोत्सवाचे १० दिवस घरात येणाऱ्या गणरायाचे रूप अधिकाधिक मनमोहक असावे, या उद्देशाने हा नवा ट्रेंड आहे,’ असे महाडिक यांनी नमूद केले.

# ५६ हजार हरकतींचा निकाल लागणार

## पिंपरी-चिंचवडचा विकास आराखडा डिसेंबरअखेर शासनाकडे!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारूप विकास योजना आराखड्यावर (डीपी प्लॅन) प्राप्त झालेल्या ५६ हजार ७७९ हरकतींपैकी २८ हजार ७२५ हरकतींवरील सुनावणी पूर्ण झाली आहे. उर्वरित हरकतींवरील सुनावणी नोव्हेंबरअखेर पूर्ण करून डिसेंबरमध्ये आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्याचे नियोजन महापालिकेच्या नगररचना विभागाने केले आहे.**




महापालिकेने सुधारित प्रारूप विकास योजना आराखडा १५ मे २०२५ रोजी प्रसिद्ध केला होता. त्यावर १४ जुलै २०२५ पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार तब्बल ५६ हजार ७७९ हरकती प्राप्त झाल्या. आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात ३ ऑगस्टपासून सात सदस्यीय समितीमार्फत सुनावणी सुरू आहे.

पिंपरी, तळवडे, थेरगाव, रहाटणी, दिघी, मोशी आणि ताथवडे या सात गावांमधील २८ हजार ७२५ हरकतींवर सुनावणी पूर्ण झाली आहे. एकाच विषयाशी संबंधित अनेक हरकती असल्याने काही हरकती समूहाने घेण्यात आल्या आहेत. मात्र, हरकतदारांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यानुसार आवश्यक बदल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

आराखड्यात महापालिका आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून वर्ग करण्यात आलेल्या क्षेत्रासह १७३.२४ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. सन २०३१ पर्यंत ४२ लाख ४० हजार आणि २०४१ पर्यंत ६१ लाख लोकसंख्या गृहीत धरून शहराच्या भविष्यातील विकासाचे नियोजन करण्यात आले आहे.

सुनावणीच्या नोटीसनंतर गैरहजर राहिलेल्या नागरिकांना संपूर्ण सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुन्हा संधी दिली जाणार आहे. त्यानंतर शासकीय यंत्रणांनी नोंदविलेल्या हरकतींवरही सुनावणी घेतली जाणार आहे.

आराखड्यावरील कार्यवाही पूर्ण करण्याची बारा महिन्यांची मुदत १४ मे २०२६ रोजी संपली होती. महापालिका निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे प्रक्रिया रखडल्याने आचारसंहितेचा कालावधी वगळून मुदत १६ जून २०२६ रोजी संपली. त्यानंतर सहा महिन्यांची मुदतवाढ घेण्यात आली आहे. आता १५ डिसेंबर २०२६ पर्यंत सुनावणी व आवश्यक कार्यवाही पूर्ण करून आराखडा शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे.

सुनावणी पूर्ण झाल्यानंतर समिती आवश्यक बदल करून आराखडा पुणे विभागाच्या नगररचना विभागाकडे पाठवेल. त्यानंतर अंतिम मान्यतेसाठी तो शासनाकडे सादर करण्यात येईल, अशी माहिती महापालिकेच्या नगररचना विभागाचे उपसंचालक ललित खोब्रागडे यांनी दिली.

### गैरहजर हरकतदारांना अखेरच्या दिवशी संधी...

नोटीस मिळाल्यानंतर काही नागरिक सुनावणीला गैरहजर होते. अशा नागरिकांना संपूर्ण सुनावणी झाल्यानंतर पुन्हा संधी दिली जाणार आहे. शेवटच्या टप्प्यात शासकीय यंत्रणांनी घेतलेल्या हरकतींवर सुनावणी घेतली जाणार असल्याचे नगररचना विभागाने सांगितले.

# स्मार्ट शाळांचा दावा फोल; २२ शाळांना मैदानच नाही!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी आणि डिजिटल शिक्षणाचा गाजावाजा करत असली, तरी महापालिकेच्या शाळांमधील क्रीडा सुविधांची अवस्था चिंताजनक असल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या १३४ शाळांपैकी तब्बल २२ शाळांना खेळाचे मैदानच नसल्याचे पाहणीत आढळले आहे. त्यामुळे या शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी खेळायचे तरी कुठे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

### २१३ क्रीडा शिक्षकांचा तुटवडा

महापालिकेच्या १३४ शाळांमध्ये सुमारे ४५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आरटीईनुसार २२५ क्रीडा शिक्षक आवश्यक असताना प्रत्यक्षात केवळ १२ शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित क्रीडा प्रशिक्षण मिळण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे.




महापालिकेच्या ११० प्राथमिक आणि २४ माध्यमिक शाळांमध्ये सुमारे ४५ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी केवळ १२ क्रीडा शिक्षक उपलब्ध आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार २०० विद्यार्थ्यांमागे एका क्रीडा शिक्षकाची आवश्यकता आहे. त्यानुसार ४५ हजार विद्यार्थ्यांसाठी सुमारे २२५ क्रीडा शिक्षक अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ १२ शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे तब्बल २१३ क्रीडा शिक्षकांचा तुटवडा आहे.

महापालिका शाळा स्मार्ट करण्यासाठी डिजिटल शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर देत आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक असलेल्या मैदाने, क्रीडासाहित्य आणि प्रशिक्षित क्रीडा शिक्षकांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. काही शाळांची मैदानेही पार्किंगसाठी वापरली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या क्रीडा संधी आणखी कमी झाल्या आहेत.

विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास घडविण्यात मैदानी खेळांची महत्त्वाची भूमिका असते. शालेय वेळापत्रकात आठवड्याला दोन ते चार तास क्रीडा विषयासाठी दिले जातात. याच काळात विद्यार्थ्यांमधील क्रीडागुण ओळखून त्यांना योग्य प्रशिक्षण देणे शक्य होते. मात्र, मैदान आणि शिक्षकांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव मिळत नाही.

शहरातील खासगी शाळांमधून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडत असताना महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना मात्र मूलभूत क्रीडा सुविधांसाठी झगडावे लागत आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका शाळा हा शिक्षणाचा प्रमुख आधार असताना क्रीडा क्षेत्रातील ही कुचंबणा त्यांच्या भवितव्यावर परिणाम करणारी ठरत आहे.

डिजिटल शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासालाही समान महत्त्व देणे आवश्यक आहे. त्यामुळे मैदान नसलेल्या शाळांना तातडीने क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे, आवश्यक क्रीडासाहित्य देणे आणि क्रीडा शिक्षकांची रिक्त पदे भरणे गरजेचे आहे.



# भूमिका

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीच्या परीक्षेसाठी आयुष्यातील उमेदीची वर्षे पणाला लावणाऱ्या विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून, 'आम्ही झिजायचे आणि तुम्ही पेपर विकायचे?' असा केलेला सवाल व्यवस्थेच्या निष्काळजीपणावर बोट ठेवणारा आहे. औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याने संपूर्ण भरतीप्रक्रिया रद्द करण्याची वेळ आली.**

## एमपीएससीचा गोंधळ अन् विद्यार्थ्यांचा उद्रेक



प्रश्नपत्रिकेच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतील व्यक्तींवरच संशय निर्माण होत असेल, तर विद्यार्थ्यांनी विश्वास ठेवायचा तरी कोणावर, हा प्रश्न गंभीर आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी म्हणजे केवळ पुस्तके वाचणे नव्हे. घरापासून दूर शहरात राहणे, खोलीचे भाडे, मेसचा खर्च, अभ्यासासाठी लागणारी पुस्तके आणि पालकांच्या कष्टाच्या पैशांवर वर्षानुवर्षे अवलंबून राहणे, या सगळ्याची किंमत विद्यार्थी मोजत असतात. नोकरीचे पर्याय बाजूला ठेवून ते एका संधीसाठी झगडतात.

अशा वेळी एखाद्या प्रश्नपत्रिकेच्या फुटीमुळे त्यांची अनेक वर्षांची मेहनत वाया जात असेल, तर तो केवळ परीक्षेतील गैरप्रकार राहत नाही; तो तरुणांच्या भवितव्याशी केलेला गंभीर अन्याय ठरतो. एमपीएससीच्या कारभाराभोवती निर्माण होणारे वाद काही नवीन नाहीत. प्रश्नपत्रिकांमधील चुका, सदोष भाषांतर, चुकीच्या उत्तरतालिका, प्रश्न रद्द होणे, परीक्षा पुढे ढकलणे, निकालांना होणारा विलंब आणि भरती प्रक्रियेबाबत निर्माण होणारे संशय यामुळे विद्यार्थ्यांना वारंवार मनस्ताप सहन करावा लागतो. प्रत्येक वेळी चौकशी समिती, सुधारणा करण्याची आश्वासने आणि काही दिवसांनी प्रकरण विस्मृतीत जाणे, हेच चक्र सुरू राहते. जबाबदार व्यक्तींनी 'त्या वेळी आम्ही पदावर नव्हतो' असे सांगून हात झटकणे सोपे आहे; मात्र संस्थेची जबाबदारी पदाबरोबरच स्वीकारावी लागते. आज विद्यार्थ्यांचा संताप महाराष्ट्रातील विविध शहरांतून व्यक्त होत आहे. पुण्यासह मुंबई, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमध्ये आंदोलनाची धार वाढत आहे. या आंदोलनाकडे राजकीय चष्म्यातून पाहणे सरकारसाठी धोकादायक ठरेल. कारण तरुणांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नाला पक्षीय चौकटीत बंदिस्त करता येत नाही.

सरकारने विद्यार्थ्यांच्या संयमाची परीक्षा घेऊ नये. या प्रकरणात केवळ फेरपरीक्षा घेऊन प्रश्न संपणार नाही. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचेपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे स्वतंत्र फॉरेन्सिक ऑडिट झाले पाहिजे. तपास यंत्रणांचा अहवाल पारदर्शकपणे समोर आला पाहिजे. दोषी अधिकारी, मध्यस्थ आणि पेपरफुटीच्या साखळीतील प्रत्येक घटकावर कठोर कारवाई झाली पाहिजे. भविष्यात एन्क्रिप्टेड प्रश्नपत्रिका, नियंत्रित मुद्रण, डिजिटल ट्रॅकिंग, पार्श्वभूमी तपासणी आणि प्रत्येक टप्प्यावर निश्चित उत्तरदायित्व यांसारख्या उपाययोजना अनिवार्य करणे गरजेचे आहे.

एमपीएससी ही केवळ नोकरी देणारी संस्था नाही; महाराष्ट्राच्या प्रशासनासाठी गुणवत्तावान आणि प्रामाणिक अधिकारी निवडणारी घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे तिच्या विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्नचिन्ह निर्माण होणे ही गंभीर बाब आहे. फुटलेली प्रश्नपत्रिका पुन्हा छापता येईल; परीक्षा पुन्हा घेता येईल; पण तरुणांच्या मनातील विश्वासाला गेलेला तडा सहज भरून निघणार नाही. सरकार आणि आयोगाने हा आक्रोश वेळीच समजून घेतला नाही, तर आजची विद्यार्थ्यांची खदखद उद्याच्या मोठ्या असंतोषात बदलू शकते.

# प्रासंगिक »

## दोन बिया

**एका शेतकऱ्याला शेत नांगरताना दोन बिया सापडल्या. त्याने त्या दोन्ही बिया जमिनीत पेरल्या. पहिली बी म्हणाली, "मला उगवायचे आहे, सूर्यप्रकाश घ्यायचा आहे आणि मोठे झाड बनायचे आहे." ती जमिनीतून वर आली.**

पावसाचे पाणी मिळाले, वाऱ्याने डोलली आणि काही दिवसांत तिची रोपे वाढू लागली. दुसरी बी मात्र घाबरली. ती म्हणाली, "जमिनीखाली राहणे सुरक्षित आहे. बाहेर आले तर पाऊस, वारा आणि किडे मला त्रास देतील." त्यामुळे ती जमिनीखालीच राहिली.

काही महिन्यांनी पहिली बी मोठे झाड बनली. तिच्यावर सुंदर फुले आली. पक्षी तिच्या फांद्यांवर बसू लागले. दुसरी बी मात्र तशीच राहिली. एके दिवशी शेतकऱ्याने झाडाकडे पाहून मुलाला सांगितले, "संधी प्रत्येकाला मिळते; पण तिचा स्वीकार करण्याचे धैर्य प्रत्येकात नसते."

मुलाला त्या दिवसापासून अपयशाची भीती वाटेनाशी झाली. त्याने प्रत्येक अडचणीला शिकण्याची संधी मानायला सुरुवात केली.

- तात्पर्य : भीतीमुळे संधी गमावू नका; धैर्याने पुढे गेल्यासच यशाची सुरुवात होते.

शासनाची यंत्रणा म्हटली की आपल्या डोळ्यांसमोर मोठ्या इमारती, अधिकारी, नियम आणि फाइलांचा ढिगारा उभा राहतो. मात्र या व्यवस्थेला खऱ्या अर्थाने चालवणारी शक्ती असते ती माणसांची.

## व्यवस्था बदलणारे हेच खरे अदृश्य नायक



एखाद्या विभागात काम करणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्याच्या प्रामाणिकपणा, कल्पकता आणि जिद्दीमुळे व्यवस्थेत मोठा बदल घडू शकतो, हे अनेकदा दुर्लक्षित राहते. महाराष्ट्र शासनातील सुमारे पाच लाख कर्मचाऱ्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापनाची जबाबदारी असलेल्या विभागात काम करताना याची प्रचिती येते. सेवा नोंदवही, पदोन्नती, बदल्या, निवृत्ती अशा कर्मचाऱ्यांच्या आयुष्याशी निगडित असंख्य बाबी या यंत्रणेतून हाताळल्या जातात. त्यामुळे या व्यवस्थेतील प्रत्येक त्रुटीचा परिणाम थेट माणसावर होतो. जुनाट संगणक, अपुरी जागा, मर्यादित साधने आणि वर्षानुवर्षे साचलेल्या फाइलांच्या गर्दीतही काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी बदलाची वाट निर्माण केली, ही बाब निश्चितच प्रेरणादायी आहे. 'लगान'मधील भुवनसमोर जशी आव्हानात्मक परिस्थिती होती, तशीच आव्हाने या प्रशासकीय टीमसमोरही होती. मात्र एका लिपिकापासून परिविक्षाधीन अधिकाऱ्यापर्यंत आणि कवयित्री असलेल्या कर्मचाऱ्यापासून तंत्रज्ञानाच्या टीमपर्यंत

प्रत्येकाने आपली जबाबदारी स्वीकारली. ब्लॉकचेन प्रकल्प, पोर्टल, मोबाइल ॲप, प्रक्रियांचे पुनर्रचनाकरण अशा माध्यमातून मर्यादित साधनांमध्ये नवे प्रयोग झाले. खरा बदल मात्र जुन्या नियमांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहिल्यानंतर घडला. कालबाह्य नियमांचा फेरविचार झाला. अनावश्यक नियम दूर करण्यात आले. वर्षानुवर्षे न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेल्या प्रश्नांची मूळ कारणे शोधून त्यावर उपाय करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या सेवेशी संबंधित माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी, प्रवेशापासून निवृत्तीपर्यंतची प्रक्रिया सुलभ व्हावी, या उद्देशाने नव्या व्यवस्थेची उभारणी झाली. यातून एक महत्त्वाचा धडा समोर येतो. प्रशासनाची संस्थात्मक क्षमता ही केवळ नियम आणि धोरणांवर अवलंबून नसते; ती ते नियम प्रत्यक्षात राबवणाऱ्या माणसांच्या क्षमतेवरही अवलंबून असते.

धोरण कितीही चांगले असले, तरी ते नागरिकांपर्यंत पोहोचवणारी यंत्रणा सक्षम नसेल तर त्याचा उपयोग मर्यादित राहतो. 'विकसित भारत' आणि विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करताना पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाइतकेच प्रशासनातील मनुष्यबळ सक्षम करणे आवश्यक आहे. कारण मोठे बदल नेहमी मोठ्या घोषणांमधून घडत नाहीत. अनेकदा ते कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता आपले काम प्रामाणिकपणे करणाऱ्या सामान्य माणसांच्या हातून घडतात. व्यवस्थेच्या इतिहासात त्यांची नावे कदाचित नोंदली जाणार नाहीत; पण व्यवस्था पुढे नेणारे हेच खरे अदृश्य नायक असतात.

# ।। अभंगवाणी ।।



मैत्र केले महा बळी ।  
कामा न येती अंतकाळीं ॥१॥

आधीं घे रे रामनाम ।  
सामा भरीं हा उत्तम ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा गुजरातला का?

## देशाच्या राजधानीत या पुरस्काराची जी उज्वल परंपरा आहे ती का मोडली जात आहे

**महाईन्यूज । मुंबई**

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुजरातमध्ये राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा सोहळा रंगणार असल्याचा मुद्दा उपस्थित करत एक सविस्तर पोस्ट केली आहे. मुंबई शहराचं महत्त्वं संपवण्याचा प्रयत्न होत असताना देशाच्या राजधानीचं जे महत्त्व आहे ते संपवण्याचाही प्रयत्न हळूहळू सुरु झाला आहे असंही राज ठाकरेंनी म्हटलं आहे. यासंदर्भात राज ठाकरेंनी एक सविस्तर पोस्ट लिहिली आहे.**



बरं समजा पुरस्कार सोहळ्याचं स्थळ हलवायचं होतं तर ते मुंबईत का नाही आणलं? ज्या दादासाहेब फाळकेंनी भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घातला त्या राज्यात का नाही पुरस्कार वितरण ? किंवा देशात सगळ्यात जास्त सिनेमे महाराष्ट्र आणि दक्षिणेतील तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा येथे घडवले जातात यापैकी कुठल्या राज्यात हा सोहळा का नाही ? दक्षिणेत तर सिनेमांनी तिथल्या राजकारणाला आकार दिला आहे. गुजरातच का ? असा सवाल राज ठाकरेंनी केला आहे.

पुढे राज ठाकरे म्हणतात, या आधी देशात अनेक पंतप्रधान होऊन गेले, ज्यांची जन्मभूमी, कर्मभूमी असलेली राज्य त्यांनी ओढूनताणून मोठी करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. इथे कॉमनवेल्थ स्पर्धा गुजरातमध्ये, २०२३ च्या क्रिकेट वर्ल्डकपचा अंतिम सामना गुजरातमध्ये, बाहेरून राष्ट्राध्यक्ष आले त्यांना गुजरातमध्ये घेऊन जायचं, गिफ्ट सिटी मुंबईतून गुजरातमध्ये न्यायची. या सगळ्यातून नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना काय दाखवायचं आहे की या देशाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा पाळणा हा गुजरातमध्ये हलला ? आज जो देश उभा आहे तो कित्येक पिढ्यांच्या त्यागातून आणि देशातील प्रत्येक प्रांताच्या योगदानातून उभा आहे. यांना गुजरातपलीकडचा देश फक्त आठवतो त्या त्या राज्यात निवडणुका आल्या की. मग तिकडे जाऊन तिथले कपडे घालून भाषणं करून, माझं कसं या राज्याशी जुनं नातं आहे सांगून मतं मिळवायची एवढंच जमतं का ?

माझी गुजराती बांधवाना विनंती आहे की तुम्ही यांच्या नादी लागून उगाच वाहवत जाऊ नका. आपल्या भाषिक नेत्यांची सत्ता आहे याच्या ज्या गुदगुल्या होत आहेत, त्या सत्ता गेली की अस्वलाच्या गुदगुल्या होतील. भारतातील इतर प्रांतांचे नागरिक आणि नेते आपल्या राज्यांवर, तिथल्या व्यावसायिकांवर काय अन्याय झाला याचा हिशेब ठेवतील. या विषयाला आम्ही वाचा फोडूच पण देशातील समस्त कलाकारांनी पण भूमिका घ्यायला हवी. सरकारच्या स्तुतीची गीतं गायला सांगितली की ती लगेच गायला सुरुवात केल्यामुळे आजची ही वेळ आली आहे. त्यामुळे सर्वांनी याविरोधात भूमिका घ्यायलाच हवी.

### राज ठाकरेंनी लिहिलेली पोस्ट

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच हे पुरस्कार देशाच्या राजधानीच्या दिल्ली शहरातून हलवून गुजरातमध्ये केवाडिया येथे होणार आहेत. देशाच्या आर्थिक राजधानीचं, मुंबई शहराचं महत्व संपवण्याचा खटाटोप एकीकडे सुरू असताना दुसरीकडे देशाच्या राजधानीचं जे महत्व आहे ते हळूहळू संपवण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे. मुळात हा पुरस्कार सोहळा हलवण्याचं कारण काय ? स्वतःला काही निर्माण करता आलं नाही की बदल नावं, बदल स्थळं आणि यातून भ्रामक इतिहास निर्माण करण्याचा प्रयत्न सध्या सुरु आहे असं दिसतंय. बरं कधी ना कधी आता उरलो गुजरातपुरते अशी आपली गत होणार याची खात्रीच वाटत असल्यामुळे किमान तिकडे तरी माहात्म्य निर्माण करून घेऊ हा अट्टाहास सध्या केंद्रातील दोन सत्ताधीशांचा दिसतोय.

# अभिजीत दिपकेंसमोर प्रथमेश देशमुखच्या आईचा टाहो

**महाईन्यूज । धाराशिव**

**प्रथमेश देशमुख या एमपीएसीचा अभ्यास करणाऱ्या मुलाने आत्महत्या केली. या घटनेने महाराष्ट्र सुन्न झाला आहे. आज अभिजित दिपके यांनी प्रथमेश देशमुखच्या घरी जात त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी प्रथमेशच्या आईने अभिजित दिपकेंसमोर टाहोच फोडला. प्रथमेश देशमुख हा धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील रहिवासी होता, तिथेच जाऊन अभिजीत दिपकेंनी त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली.**



माझा मुलगा पुण्यात शिकायला गेला होता. त्याला अधिकारी व्हायचं होतं. प्रथमेश अधिकारी बनून लाल दिव्याच्या गाडीतून येणार होता. पण काल रात्री तो अॅम्ब्युलन्समधून आला, असा टाहोच प्रथमेश देशमुखच्या आईने अभिजीत दीपके यांच्यासमोर फोडला आहे. एमपीएससीचा अभ्यास करणाऱ्या प्रथमेशने टोकाचं पाऊल उचलल्याने राज्यात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दीपके यांनी आज धाराशिवमध्ये जाऊन प्रथमेश देशमुखच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांचं सांत्वन केलं. यावेळी प्रथमेशच्या आईने हा काळीज चिरणारा सवाल करताच सर्वच हेलावले.

अभिजीत दीपके यांनी यानंतर माध्यमांशी संवाद साधला, ते म्हणाले, प्रथमेशची परिस्थिती हलाखीची होती. त्याचे दाजी त्याला महिन्याला ८ ते १० हजार रुपये पाठवायचे. त्यातून तो पुण्यात शिक्षण घ्यायचा. पैसे अपुरे पडायचे म्हणून एकवेळच जेवायचा. त्याची कौटुंबिक परिस्थिती चांगली नाही. त्याला वडील नाहीत. आई आणि पाच बहिणी आहेत. त्याची आई म्हणतेय, माझा मुलगा लाल दिव्याच्या गाडीत येणार होता. पण काल रात्री तो अॅम्ब्युलन्समध्ये आला. हे कशामुळे झालं? असं मला त्याच्या आईने विचारलं असं दिपके म्हणाले. दिपके पुढे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची परिस्थिती चांगली नसते. प्रथमेशच्या वाट्यालाही तेच आलं. त्याच्यावर दोन अडीच लाखाचं कर्ज होतं. मित्रांकडून त्याने पैसे उधार घेतले होते. ते फेडता येत नव्हते. इतरही विवंचना त्याला होत्या. त्यातच शेतीही वाहून गेली. मोठं आर्थिक संकट कोसळलं. त्यामुळे त्याने टोकाचा निर्णय घेतला. केवळ दोन अडीच लाखासाठी त्याला जीवन संपवावं लागलं, असं म्हणत अभिजीत दिपकेंनी संताप व्यक्त केला. या घटनेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवरील आर्थिक आणि मानसिक ताणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत टोकाचं पाऊल न उचलता आपल्या अडचणी कुटुंबीय, मित्र किंवा विश्वासू व्यक्तींशी बोलून व्यक्त कराव्यात, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

### नेमकं काय घडलं?

प्रथमेश देशमुख नावाच्या २५ वर्षीय तरुणाने स्वतःचे आयुष्य संपवल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परीक्षा पुढे जाणे, अनेक काळ निकाल न लागणे, म्हणावी तशी भरती न होणे आणि आता पेपरफुटीची प्रकरणे यामुळे एमपीएससी करणाऱ्या परीक्षार्थींमध्ये नैराश्याचे वातावरण आहे. प्रथमेश देशमुख हा धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील रहिवासी होता. मागच्या दोन वर्षांपासून तो पुण्यात राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करत होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून तो आर्थिक अडचणीत सापडला होता. परीक्षेची तयारी करताना डोक्यावर झालेले कर्ज आणि त्यातच राहत्या खोलीचे भाडे थकल्यामुळे त्याने आयुष्य संपवल्याचा दावा केला जात आहे.

# मि. सिंग आमच्या देशातून निघून जा

## ट्रम्प प्रशासनाची भारतीयांविरोधात वंशद्वेषी जाहिरात; सोशल मीडियावर वाद निर्माण

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभागाने (होमलँड सिक्युरिटी) सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या एका जाहिरातीमुळे वाद निर्माण झाला आहे. स्वतः देशातून निघून जा किंवा परिणाम भोगायला तयार व्हा, असा संदेश या जाहिरातीमधून भारतीयांना देण्यात आला आहे. या जाहिरातीवर आता टीका होत असून अनेकांनी याला वंशवादी आणि भारत विरोधी म्हटले आहे. एआयच्या मदतीने तयार केलेली ही पोस्ट होमलँड सिक्युरिटीच्या अधिकृत हँडलवर शेअर करण्यात आली आहे. ट्रम्प प्रशासनाने गेल्या काही काळापासून स्थलांतरितांविरोधात सुरू केलेल्या आक्रमक कारवाईचा प्रत्यय यातून येत आहे.**




हॉलिवूडच्या ट्रान्सफॉर्मर्स या चित्रपटातील 'ऑप्टिमस प्राइम' या रोबोटिक पात्राचा वापर करून सदर जाहिरात तयार करण्यात आली आहे. ज्यामध्ये दाढी असलेल्या एका भारतीय चेहरेपट्टीच्या व्यक्तीला 'मि. सिंग' असे संबोधून अमेरिकेतून निघून जाण्याची धमकी देण्यात आली आहे. "स्वतःहून निघून जा, नाहीतर परिणाम भोगण्यासाठी तयार व्हा", असा इशारा ऑप्टिमस प्राइम देतो.

या पोस्टमध्ये फोटोखाली एक संदेशही लिहिला आहे. "आमच्या रस्त्यांवरून चालते व्हा. मि. सिंग गाडी कशी चालवायची हे तुम्हाला कळत नाही", भारतीय आणि शीख आडनाव वापरून तयार केलेल्या या पोस्टमुळे आता नवा वाद निर्माण झाला आहे.

होमलँड सिक्युरिटीने गेल्या काही काळापासून अवैध स्थलांतरित आणि स्थलांतरित ट्रक चालकांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून सदर पोस्ट केल्याचे सांगितले जाते.

याचबरोबर एक व्हिडीओही पोस्ट केला गेला आहे. ज्यात ट्रान्सफॉर्मर्स सिनेमातील खलनायक मेगाट्रॉन दाखवला गेला आहे. व्हिडीओमधील हा मेगाट्रॉन रस्ते अपघात आणि इतर गुन्ह्यांसाठी अटकेत असलेले चालक हरजिंदर सिंग, राजिंदर कुमार, जसवीर सिंग आणि इतरांची सुटका करण्याची मागणी करतो. फाऊंडेशनने केलेल्या एक्सवरील पोस्टमध्ये अतिरिक्त महाधिवक्ता हरमीत के ढिल्लन आणि एफबीआयचे संचालक काश पटेल यांनाही टॅग केले आहे. "फेडरल यंत्रणेकडून राजकारणाच्या पलीकडे जात भेदभाव दर्शवणारी पोस्ट शेअर केली आहे. याबद्दल सुरू केलेल्या चौकशीचे आम्ही स्वागत करतो", असे एचएएफने म्हटले आहे.

### हिंदू आणि भारतीय संघटनांकडून विरोध

होमलँड सिक्युरिटीच्या या जाहिरातीनंतर त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. हिंदू अमेरिकन फाऊंडेशन (एचएएफ) आणि शीख कोएलिशन यासारख्या संघटनांनी या जाहिरातीचा विरोध केला आहे. एचएएफने केलेल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले, "हिंदू आणि शीखांमध्ये सिंग येतात. ते अमेरिकन असून वाहन चालवणे त्यांचा हक्क आहे. होमलँडने केलेल्या भारतविरोधी, बिगरअमेरिकन जाहिरातीमुळे आमच्यासारख्यांच्या राष्ट्रीय भावनेला धक्का बसला आहे."

---

# अखेर सस्पेन्स संपला! चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग ब्रिक्स शिखर परिषदेसाठी भारतात

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी नवी दिल्लीला येणार आहेत. चीनने देखील या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणानंतर राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग १२ ते १३ सप्टेंबर दरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहतील, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.**



दरम्यान, गेल्या काही वर्षात भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये सुधारणा झाली आहे. गेल्या वर्षी पंतप्रधान मोदींनी चीनला भेट दिली होती. २०२० च्या चकमकींनंतर भारताने चिनी गुंतवणुकीवर लादलेले काही निर्बंध शिथिल केले आहेत ,विशेषत: इलेक्ट्रॉनिक्स, कॅपिटल गुड्स आणि सोलर सेल क्षेत्रांवर भर दिला गेला आहे.

चिनी कंपन्यांच्या भारतातील प्रस्तावित गुंतवणुकीची आता खुद्द बीजिंगकडूनच अधिक कडक तपासणी केली जात आहे, असे वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले. चीनचा अत्याधुनिक उत्पादन आणि उच्च-तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या क्षेत्रांच्या तपासणीवर भर आहे. BRICS नेत्यांच्या बैठकीसाठी जिनपिंग भारतात येणार आहेत का? याबाबत चिनी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी उत्तर दिले नव्हते. त्यांना याबाबत माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले होते.

नवी दिल्लीत ११ ते १३ सप्टेंबर रोजी ब्रिक्स शिखर परिषद होणार आहे. या परिषदेसाठी ब्रिक्स देशांचे राष्ट्रप्रमुख भारतात दाखल होत आहेत. मात्र ब्रिक्समध्ये रशियाचे राष्ट्रपती पुतीन आणि इराणचे राष्ट्रपती पेजेश्कियान सामील होणार की नाही याबाबत अजून दुजोरा मिळालेला नाही.

याचबरोबर चीनचे राष्ट्रपती शी जिंगपिंग हे देखील भारत भेटीवर येतील याबाबत खात्रीशील माहिती मिळालेली नाहीये. गुरूवारी चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून एक पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यावेळी प्रवक्ते जियाकुन यांना चीनचे प्रमुख नेते पुढच्या आठवड्यात भारतात होणाऱ्या ब्रिक्स परिषदेला उपस्थित राहणार आहे का? असा प्रश्न विचारला. या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी, 'तुम्ही विचारल्या गेलेल्या प्रश्नावर माझ्याकडे देण्यासाठी कोणतीही माहिती नाहीये.'

यानंतर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या अधिकृत वेबसाईटवरून शी जिंगपिंग हे भारतात होणाऱ्या १८ व्या ब्रिक्स परिषदेला उपस्थित राहतील. ते १२ आणि १३ सप्टेंबरला दिल्लीत असतील अशी घोषणा केली.

### गलवान चकमकीनंतर पहिलाच दौरा

२०२० मधील गलवान खोऱ्यात झालेल्या चकमकीनंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले होते. या चकमकीत २० भारतीय सैनिक आणि काही चिनी सैनिक मारले गेले होते. त्यानंतर क्षी जिनपिंग यांचा गेल्या सात वर्षांतील पहिलाच भारत दौरा ठरणार आहे. २०१९ मध्ये जिनपिंग यांनी चेन्नईजवळील महाबलीपुरम येथे पंतप्रधान मोदींबरोबर एका परिषदेसाठी भारताचा दौरा केला होता. त्याआधी सप्टेंबर २०१४ मध्ये क्षी जिनपिंग पहिल्यांदा भारतात आले होते. यानंतर २०१६ मध्ये ब्रिक्स शिखर परिषदेसाठी त्यांनी गोव्यात हजेरी लावली होती.

# ‘नयी नवेली’चा भन्नाट टीझर रिलीज



बहुप्रतीक्षित ‘नयी नवेली’ या थिएट्रीकल चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. कौटुंबिक नात्यांमधील गंमती-जमती, विनोद, फँटसी आणि दमदार ॲक्शन या चित्रपटात पाहता येणार आहे. ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओज आणि कलर यलो यांच्या या चित्रपटात यामी गौतम धर प्रमुख भूमिकेत आहे. दिग्दर्शन बालाजी मोहन तर हिमांशू शर्मा आणि दिव्य निधी शर्मा यांनी चित्रपटाची कथा आणि पटकथा लिहिली आहे. तर प्रसिद्ध संगीतकार जी. व्ही. प्रकाश कुमार यांनी चित्रपटाला संगीत दिले आहे. टीझरची सुरुवात एका अगदी सामान्य आणि साध्यासुध्या कुटुंबाच्या वातावरणातून होते. मात्र, कुटुंबातील दीर अचानक आपल्या भावजयीवर गंभीर आणि धक्कादायक आरोप करत, "भाभी डायन आहे!" असे म्हणतो. या एका वाक्यानंतर कुटुंबाच्या आयुष्यात सुरू होतो विचित्र घटनांचा सिलसिला. त्यानंतर समोर येणारी अनोखी पात्रे, गूढ प्रसंग आणि अनपेक्षित घडामोडींसाठी चित्रपट पाहावा लागणार आहे. या सगळ्या गोंधळाच्या मध्यभागी यामी गौतम धर एका पूर्णपणे वेगळ्या आणि यापूर्वी कधीही न पाहिलेल्या भूमिकेत दिसत आहे. तिची व्यक्तिरेखा काय असेल हे फारसे टीझरमध्ये दि,त नाही. पण तरीही तिच्या लूकमुळे हा हॉरर मिस्ट्री थ्रीलर असल्याचे लक्षात येते. ‘नयी नवेली’ची कथा अशा जगात घडते, जिथे दिसतंय तेच खरं आहे असं मानणं कठीण आहे. एका धक्कादायक आरोपामुळे सुरू झालेल्या घटनांची मालिका पुढे कोणते वळण घेते, हे पाहणे रंजक ठरणार आहे. आनंद एल. राय आणि हिमांशू शर्मा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून बालाजी मोहन यांनी दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटात यामी गौतम धरसोबत आदिनाथ एम. कोठारे, अनुराग ठाकूर, सुनिता रजवार, मीता वशिष्ठ, आदित्य कुलश्रेष्ठ, सुस्मिता मुखर्जी, सोनल झा, सुनील सिन्हा, प्रतीक पचोरी, अक्षत सिंग, बबिता पांडे, अजय पाल आणि नीरज सिंग हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. दसऱ्याच्या मुहूर्तावर ‘नयी नवेली’ मोठ्या पडद्यावर दाखल होणार आहे. हा चित्रपट १६ ऑक्टोबर २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यामी गौतमचा हा हटके अवतार आणि चित्रपटाची अनोखी कथा काय कुतुहल घेऊन येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## अजय देवगण आणि तब्बूचा खास अंदाज

अभिनेता अजय देवगणची मुख्यभूमिका असलेला ‘दृश्यम ३’चा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या ट्रेलर लाँचला अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती. या ट्रेलर लाँच इव्हेंटमधील तब्बू आणि अजय देवगणचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये अजय देवगण आणि तबू पापाराझींना कॅमेऱ्यासमोर फोटोसाठी पोझ देताना दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये दिसतंय की अजय देवगण फोटोसाठी उभा असताना पाठीमागून तबू येते आणि त्याच्या हात हातात घालून पापाराझींना फोटोसाठी पोझ देते. या व्हिडीओतून पडद्यामागचीही त्यांची केमिस्ट्री पाहायला मिळत आहे. यावर चाहत्यांनी “ही मैत्री नाही तर प्रेम आहे”, “जेव्हा तब्बू त्याच्या आजूबाजूला असते तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर वेगळचं तेज असतं”, “क्यूट जोडी”, अशा अनेक कमेंट्स केल्या आहेत. या सोहळ्यात अजय देवगण डेनिम जीन्स आणि व्हाईट शर्टमध्ये बिंधास्त दिसला, तर तब्बूने ब्लॅक ड्रेसमध्ये उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. अजय आणि तब्बूने या खास प्रसंगासाठी ‘ब्लॅक अँड व्हाईट’ ड्रेस निवडला होता. दरम्यान, अजय देवगण आणि तब्बू यांची जोडी बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय जोड्यांपैकी एक मानली जाते. दोघांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले असून त्यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री प्रेक्षकांना नेहमीच आवडली आहे. दरम्यान, ‘दृश्यम’ फ्रँचायझीच्या आधीच्या चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता.

## ‘अमर प्रेम कथा’

आगामी व्हॅलेंटाईन डे प्रेमाच्या चाहत्यांसाठी यंदा काहीतरी हटके घेऊन येणार आहे. प्रेमकथेच्या पारंपरिक चौकटीला हॉरर आणि कॉमेडीची अनोखी फोडणी देणाऱ्या ‘अमर प्रेम कथा’ या मराठी चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. त्यामुळे या वेगळ्या धाटणीच्या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. पोस्टरमध्ये एका बाजूला मानवी हात, तर दुसऱ्या बाजूला भुताचा हात दिसतो. या दोन्ही हातांच्या मध्यभागी काट्यांनी वेढलेले लाल गुलाबाचे फूल आहे. प्रेमाचे प्रतीक असलेल्या गुलाबाभोवती दिसणारे काटे आणि त्यासोबतची भुताटकी प्रतिमा चित्रपटाच्या रोमँटिक कथेला असणाऱ्या हॉरर टचची झलक देतात. पोस्टरच्या या संकल्पनेतूनच ‘अमर प्रेम कथा’ ही नेहमीच्या प्रेमकथांपेक्षा वेगळी असल्याचे जाणवते. ‘सुपर डुपर’ या चित्रपटाच्या यशानंतर लेखक-दिग्दर्शक समीर आशा पाटील पुन्हा एकदा एका आगळ्यावेगळ्या विषयासह प्रेक्षकांसमोर येत आहेत. यावेळी त्यांनी प्रेम, भीती आणि विनोद यांचा संगम चित्रपटात पाहायला मिळणार आहे. चित्रपटात मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय कलाकारांची मोठी फळी पाहायला मिळणार आहे. प्रथमेश परब, रितिका श्रोत्री, ओंकार भोजने, पार्थ भालेराव, रोहित माने, विनायक माळी आणि सयाजी शिंदे हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहे.



# ईस्ट झोनचा ‘दुलीप’ दणका!

## इशान किशनच्या नेतृत्वाची कमाल; १३ वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपला

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशांतर्गत क्रिकेटमधील मानाच्या दुलीप ट्रॉफी २०२६ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ईस्ट झोन संघाने ऐतिहासिक कामगिरी करत जेतेपदावर नाव कोरले आहे. कर्णधार इशान किशनच्या नेतृत्वाखाली ईस्ट झोनने साऊथ झोनविरुद्धचा अंतिम सामना अनिर्णित राखत पहिल्या डावातील भक्कम आघाडीच्या बळावर विजेतेपदाचा मान पटकावला. ईस्ट झोनने तब्बल १३ वर्षांनंतर दुलीप ट्रॉफी जिंकण्याचा पराक्रम केला असून, या विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो स्वतः कर्णधार इशान किशन.**



अंतिम सामन्यात ईस्ट झोनच्या फलंदाजांनी पहिल्या दिवसापासूनच साऊथ झोनच्या गोलंदाजांवर निर्विवाद वर्चस्व गाजवले. पहिल्या डावात ईस्ट झोनने ७०८ धावांचा महाकाय डोंगर उभारला. यामध्ये कर्णधार इशान किशनने २७० धावांची अप्रतिम द्विशतकी खेळी साकारली, तर कुमार कुशाग्रने १०१ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. या डोंगराएवढ्या आव्हानाचा पाठलाग करताना साऊथ झोनचा पहिला डाव अवघ्या ३३६ धावांवर गारद झाला. साऊथ झोनकडून कर्णधार तिलक वर्माने ९९ आणि देवदत्त पडिक्कलने ६२ धावा करून लढा देण्याचा प्रयत्न केला, मात्र इतर फलंदाजांनी नांगी टाकली.

पहिल्या डावात ३७२ धावांची भक्कम आघाडी मिळाल्यानंतर ईस्ट झोनने दुसऱ्या डावातही फटकेबाजी सुरू ठेवली. कुरेशीच्या ११६ धावा आणि इशान किशनच्या नाबाद ८० धावांच्या जोरावर ईस्ट झोनने दुसऱ्या डावात ३८८ धावा उभारल्या. सामन्याच्या अंतिम दिवशी निकालाची शक्यता उरली नसल्याने दोन्ही कर्णधारांनी सामंजस्याने सामना अनिर्णित (ड्रॉ) घोषित केला. मात्र, पहिल्या डावातील प्रचंड आघाडीच्या निकषावर ईस्ट झोनला अधिकृतपणे विजेता घोषित करण्यात आले.

### इशान किशन ठरला सामनावीर

अंतिम सामन्यातील दोन्ही डावांत मिळून ३५० धावा (२७० आणि ८०) कुटणाऱ्या इशान किशनला सामनावीर (मॅन ऑफ द मॅच) पुरस्काराने गौरवण्यात आले. तर संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या साऊथ झोनचा कर्णधार तिलक वर्मा मालिकावीर (मॅन ऑफ द सिरीज) पुरस्काराचा मानकरी ठरला. कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारत संघाला १३ वर्षांनंतर चॅम्पियन बनवणाऱ्या इशान किशनच्या या खेळीचे क्रिकेट वर्तुळात जोरदार कौतुक होत आहे.

## कार्लोस अल्कराझचा कडवा प्रतिकार, शेल्टनचा ऐतिहासिक विजय

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**रात्रीचा दिवस करून खेळल्या जाणाऱ्या यंदाच्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत यजमान देशाचा बेन शेल्टन आणि स्पेनचा कार्लोस अल्कराझ यांच्यातील लढतीने थराराची परिसीमा गाठली. मंगळवारी रात्री सुरू झालेली ही मॅरेथॉन लढत स्थानिक वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.३३ वाजता संपली. इतक्या उशिरापर्यंत चाललेल्या सामन्यातही जवळपास पूर्ण भरलेल्या आर्थर ॲश स्टेडियममधील प्रेक्षकांचा उत्साह शेवटपर्यंत कायम राहिला. यात शेल्टनने ग्रँडस्लॅम कारकीर्दीतील सर्वांत मोठा विजय मिळवताना गतविजेत्या अल्कराझला ‘चीत’ केले.**



### सर्वांत उशिरा विजय आणि पराभव...

अमेरिकन खुल्या स्पर्धेत सर्वांत उशिरा सामना जिंकण्याचा आणि पराभव स्वीकारण्याचा विक्रम आता अल्कराझच्या नावावर आहे. यापूर्वी २०२२मध्ये उपांत्यपूर्व फेरीत अल्कराझने यानिक सिन्नेरविरुद्धचा सामना स्थानिक वेळेनुसार पहाटे २.५० वाजता संपवून विजय मिळवला होता. आता हा विक्रम मागे पडला. मात्र, यावेळी पहाटे ३.३३ वाजता संपलेल्या सामन्यात त्याला शेल्टनविरुद्ध पराभव पत्करावा लागला.

उत्तररात्रीचे तास पुढे सरकत असताना अल्कराझची निराशा वाढत चालली होती. सुरुवातीला एकाग्र होऊन लढा देणाऱ्या अल्कराझची ऊर्जा हळूहळू संपत गेली. त्याला उलट्याही झाल्या. एका टप्प्यावर त्याला चेंडू कोर्टमध्ये ठेवणेही कठीण जात होते. त्याने सलग नऊ गेम गमावले. मात्र, या अशक्यप्राय परिस्थितीतूनही त्याने पुन्हा सामन्यात पुनरागमन केले. त्यामुळे ही वर्षातील सर्वांत उल्लेखनीय लढतींपैकी एक ठरली. दुसऱ्या मानांकित अल्कराझचे प्रयत्न अखेर शेल्टनने हाणून पाडला.

४ तास २९ मिनिटांच्या झुंजीनंतर अल्कराझचा ६-७ (५-७), ६-१, ६-३, १-६, ७-६ (१०-७) असा पराभव केला. ही अमेरिकन खुल्या स्पर्धेच्या इतिहासात सर्वांत उशिरा संपलेली लढत ठरली. या विजयासह डावखुऱ्या शेल्टनने प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. आता त्याची गाठ अमेरिकेच्याच फ्रान्सिस टियाफोशी पडेल. टियाफोने ॲलेक्स मिचेलसेनचा ५-७, ३-६, ७-५, ६-३, ७-६ (१०-६) असा पराभव करत तिसऱ्यांदा या स्पर्धेची उपांत्य फेरीत धडक मारली. पहिले दोन सेट गमावल्यानंतर निर्णायक पाचव्या सेटमध्ये ०-३ अशी पिछाडी भरून काढत टियाफोने विजयावर शिक्कामोर्तब केले. या शतकात अमेरिकन खुल्या स्पर्धेत तीन उपांत्य फेऱ्यांमध्ये पोहोचणारा टियाफो हा आंद्रे आगासीनंतरचा पहिला अमेरिकन पुरुष खेळाडू ठरला आहे.

गतविजेत्या अरिना सबालेन्काला महिला एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत संघर्ष करावा लागला. सबालेन्काने लिंडा नोस्कोव्हाला ७-६ (७-१), ३-६, ७-६ (१०-७) असे नमवले. आता उपांत्य फेरीत तिची जेसिका पेगुलाशी गाठ पडणार आहे. पेगुलाने २६व्या मानांकित एमा नव्हारोचा ३-६, ६-४, ६-३ असा पराभव केला.

अल्कराझच्या पराभवामुळे यंदाच्या अमेरिकन खुल्या स्पर्धेला नवा विजेता मिळणार हे निश्चित झाले आहे. विशेष म्हणजे, हा विजेता अमेरिकेचाही असू शकतो. कारण एका उपांत्य लढतीत बेन शेल्टन आणि फ्रान्सिस टियाफो हे दोन अमेरिकेचेच खेळाडू आमनेसामने येणार आहेत. अमेरिकेच्या अँडी रॉडिकने २३ वर्षांपूर्वी या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होते. त्यानंतर एकाही अमेरिकन पुरुष खेळाडूला ही स्पर्धा जिंकता आलेली नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार ।
दि. 11 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# दुचाकी चोराच्या मुसक्या आवळल्या

## ३ गुन्हे उघडकीस; सराईत आरोपी अटकेत, १ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट-३ ने उल्लेखनीय कामगिरी करत मोटारसायकल चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणले असून एका सराईत आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून सुमारे १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या निर्देशानुसार गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू होता. त्याच अनुषंगाने ८ सप्टेंबर रोजी गुन्हे शाखा युनिट-३ चे पथक मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करत असताना पोलीस अंमलदार अजित रुपनवर व त्यांच्या सहकाऱ्यांना गोपनीय माहिती मिळाली. चिखली येथील घरकुल परिसरात एक रेकॉर्डवरील आरोपी चोरीच्या दुचाकींची विल्हेवाट लावत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव जॉर्डन राजेश साळवे (वय २०, रा. घरकुल, चिखली) असे सांगितले.

आरोपीच्या ताब्यातील होंडा ॲक्टिव्हा (एमएच १४ एफक्यू १६८३) बाबत विचारणा केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, सखोल चौकशीनंतर त्याने सदर वाहन चिखली परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली. तसेच रुपीनगर येथून हिरो स्प्लेंडर (एमएच १४ जीझेड १२३७) आणि दापोडी परिसरातून आणखी एक स्प्लेंडर मोटारसायकल चोरी केल्याचीही कबुली दिली.

या कारवाईत चिखली पोलीस ठाण्यात दाखल असलेले दोन आणि दापोडी पोलीस ठाण्यातील एक असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत. चोरीस गेलेल्या सर्व दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक गोसावी, पोलीस उपनिरीक्षक जावळे तसेच पोलीस अंमलदार सोमनाथ बोऱ्हाडे, स्वप्निल महाले, अजित रुपनवर, तुषार वराडे आणि दिलीप राठोड यांनी पार पाडली.

# विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते यशवंतभाऊ भोसले यांचा सन्मान!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**कामगार आणि श्रमिकांच्या हक्कासाठी गेल्या ३५ वर्षांपासून सातत्याने संघर्ष करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांचा मराठी पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांच्या हस्ते (दि.८) स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन विशेष सम्मान करण्यात आला.यावेळी सोहळ्यात संघटनेच्या सभासदांनी व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या जल्लोषात आनंद व्यक्त केला.**



मराठी पत्रकार संघाच्या वतीने ऑटो क्लस्टर सभागृहामध्ये एका विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.पद्मश्री गिरीशजी प्रभुणे,विधान परिषदेचे आमदार श्री अमितजी गोरखे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ.विजयजी सूर्यवंशी, दैनिक लोकमतचे संपादक संजयजी आवटे यांनी कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांच्या कार्याचे कौतुक केले व पत्रकार संघाने योग्य निवड या सन्मानासाठी केली याकरिता समाधान व्यक्त केले.

कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ कष्टकरी, कामगार आणि श्रमिकांच्या हक्कासाठी, न्याय्य मागण्यांसाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत लढाऊ व निस्वार्थपणे काम केले आहे. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी राज्यभरातील कामगार वर्गात एक हक्काचा आणि विश्वासाचा चेहरा म्हणून ओळख निर्माण केली असून कामगार आणि कंपन्यांमधील व्यवस्थापनामध्ये समन्वय साधत असतानाच, कर्मचाऱ्यांना त्यांचे कायदेशीर हक्क, योग्य वेतन आणि योग्य न्याय कायदेशीर मार्गाने मिळवून दिला आहे.

कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी सातत्याने घेतलेले श्रम आणि विविध पातळ्यांवर दिलेला लढा हा कामगार चळवळीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्यांच्या याच निष्ठावान आणि कर्तृत्ववान सामाजिक कार्याचा गौरव म्हणून मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. कामगार चळवळीला नवी दिशा देणारे आणि तळागाळातील घटकांना न्याय मिळवून देणारे एक अभ्यासू व आक्रमक नेते म्हणून त्यांची महाराष्ट्रभर ओळख आहे. हा बहुमोल पुरस्कार आयुष्यातील अत्यंत आठवणीत राहणारा आणि प्रदीर्घ संघर्षाची पावती देणारा क्षण असल्याची भावना कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी यावेळी व्यक्त केली.

तसेच, राजकीय संपादिका (मुंबई) श्रीमती मृणालिनी नानिवडेकर, दै. पुढारीचे संपादक श्री. सुनीलजी माळी, न्यूज १८ मराठी मुंबईचे सहसंपादक श्री. विशालजी परदेशी, सकाळ पुणेचे ज्येष्ठ पत्रकार श्री. राज काची, आणि लेटसअप पुणेचे संपादक श्री. योगेशजी कुटे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विधानसभा अध्यक्ष मा. श्री. राहुलजी नार्वेकर यांची 'आमदारांचे हेडमास्टर' या विषयावर विविध मुद्द्यांवर प्रकट मुलाखत घेतली, ज्याला उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विधानसभा अध्यक्ष मा.श्री राहुल जी नार्वेकर, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ विजयजी सूर्यवंशी, एस एम बी पी स्कूल चे चेअरमन डॉक्टर डी के भोसले, ऑटो संघटनेचे अध्यक्ष श्री बाबा कांबळे, दान से उडान चे संस्थापक श्री रवी घाटे, आवटी ग्रुप चे चेअरमन श्री बाबासाहेब आवटी यांचाही विशेष सन्मान देऊन यावेळी गौरवण्यात आले.

हा भव्य व अद्वितीय सोहळा यशस्वी करण्यासाठी मराठी पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष श्री किरणजी जोशी, प्रदेश उपाध्यक्ष श्री. विवेकजी इनामदार, आणि प्रदेश सचिव श्री. हरिभाऊ प्रक्षाळे यांनी अत्यंत सुंदर व नेटके नियोजन केले होते. कामगारांच्या हक्कासाठी ३५ वर्षे अविरत लढा देणाऱ्या श्री. यशवंतभाऊ भोसले यांचा झालेला हा सन्मान राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे. या समारंभात विशेष सन्मान केल्याबद्दल आयोजकांचे व सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# पिंपरी चिंचवडमध्ये इराणी टोळीचा पर्दाफाश

## १५ गुन्ह्यांचा छडा; ३५ लाख ३३ हजारांचे २७ तोळे सोने पोलिसांच्या हाती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने धडक कारवाई करत सराईत इराणी टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपी फिदा हुसैन मानूअली, मुकेश अरुण नेटके यांच्यासह इतर साथीदारांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून तब्बल ३५ लाख ३३ हजार रुपये किंमतीचे २७ तोळे सोने जप्त करण्यात आले आहे.**



शहरात वाढत्या सोनसाखळी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विविध तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत या टोळीचा माग काढला. अखेर मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले.

पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरातील सोनसाखळी चोरीचे १५ गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत लाखोंमध्ये असून, यामुळे अनेक गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

दरम्यान, अटक करण्यात आलेल्या आरोपींनी पिंपरी चिंचवडसह इतर शहरांमध्येही अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू असून मालमत्ता गुन्हे विरोधी पथक आरोपींची सखोल चौकशी करत आहे. या यशस्वी कारवाईबद्दल पिंपरी चिंचवड पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक होत असून, शहरातील गुन्हेगारीवर लगाम लावण्यासाठी पोलिसांनी आणखी कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



## आळंदी घाटावर 'वसुली'च्या वादातून दोन तृतीयपंथी गटांत हाणामारी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

आळंदी येथील इंद्रायणी नदीकाठच्या घाटावर 'वसुली'च्या कारणावरून दोन तृतीयपंथी गट आमनेसामने आल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. भाविकांची गर्दी असतानाच झालेल्या या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या घटनेत एका व्यक्तिला नकल-डस्टरने मारहाण करण्यात आल्याचा आरोप असून, जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मात्र, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

इंद्रायणी नदीच्या घाटावर 'वसुली' कोण करणार, यावरून दोन गटांमध्ये वाद झाल्याची प्राथमिक माहिती आहे. वाद वाढल्यानंतर दोन्ही गटांमध्ये शिवीगाळ आणि मारामारी सुरू झाली. या वेळी एका व्यक्तीवर नकल-डस्टरने हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच काही जणांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

हाणामारीमुळे घाटावर काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. या गोंधळाचा फायदा घेत काही भाविकांच्या मंगळसूत्रांसह मोबाईल फोन गायब झाल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे घटनेमुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

पोलिसांनी या प्रकरणाची नोंद घेत सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे. हाणामारी, धमकी तसेच चोरीच्या आरोपांबाबत पोलिसांकडून अधिक तपास केला जात आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, उत्सवाचा आनंद घेताना पर्यावरण संवर्धन आणि शहराच्या स्वच्छतेची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारावी. गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि शाश्वत पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नागरिकांना केले आहे.**




### नैसर्गिक सजावटीला द्या प्राधान्य

गणेशोत्सव मंडप आणि घरगुती सजावटीसाठी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळून नैसर्गिक व पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करण्याचे आवाहनही महापालिकेने केले आहे. विद्युत रोषणाईसाठी आवश्यकतेनुसार एलईडी दिव्यांचा वापर करून ऊर्जाबचतीला प्राधान्य द्यावे. ध्वनीविषयक नियमांचे पालन करून ध्वनी प्रदूषण होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी.

गणेशमूर्तीची निवड करताना शाडू मातीच्या तसेच नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या मूर्तींना प्राधान्य द्यावे. जलप्रदूषणाचा धोका लक्षात घेता पीओपीच्या मूर्तींचा वापर टाळून पर्यावरणपूरक मूर्तींची निवड करावी. गणेशमूर्तींचे विसर्जन नदी, नाला अथवा तलावात न करता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम हौद अथवा कृत्रिम जलकुंडातच करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

"गणेशोत्सवाची परंपरा, श्रद्धा आणि उत्साह कायम ठेवतानाच पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक सजावट, निर्माल्याचे स्वतंत्र संकलन आणि कृत्रिम विसर्जन व्यवस्था यांचा वापर करून नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला हातभार लावावा. नागरिकांच्या सहभागातूनच स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहराचा संकल्प प्रत्यक्षात येईल," असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

गणेशोत्सवादरम्यान निर्माण होणारे निर्माल्य जलस्रोतांमध्ये विसर्जित न करता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या निर्माल्य संकलन केंद्रात स्वतंत्रपणे जमा करावे. तसेच ओला, सुका आणि विशेष काळजीचा कचरा स्वतंत्रपणे संकलित करून महापालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेकडे द्यावा.

"गणेशोत्सवाच्या काळात स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन या बाबींकडे नागरिकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. निर्माल्य व कचऱ्याचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करून ते महापालिकेच्या संकलन व्यवस्थेकडे देणे, तसेच कृत्रिम विसर्जनस्थळांचा वापर करणे, या छोट्या छोट्या कृतींतून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साकारता येईल," असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही केवळ संकल्पना न राहता ती नागरिकांच्या प्रत्यक्ष कृतीतून साकार होणे आवश्यक आहे.

# आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलचे चमकदार यश

## चौथ्या राज्यस्तरीय लाठी-काठी स्पर्धेत पटकावले उपविजेतेपद!

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**'असोसिएशन ऑफ गतका, महाराष्ट्र' यांच्या वतीने लोणावळा येथील सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या राज्यस्तरीय महाराष्ट्र गतका अजिंक्यपद व लाठी-काठी स्पर्धेत पिंपरी-चिंचवड येथील आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अद्भुत कामगिरी करत उपविजेतेपद (सर्वसाधारण द्वितीय क्रमांक) पटकावले. शाळेतील बालखेळाडूंनी आपल्या तंत्रशुद्ध कौशल्याच्या जोरावर तब्बल ४७ पदकांची कमाई केली.**



> आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय लाठी-काठी स्पर्धेत मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. आपल्या पारंपरिक मैदानी खेळांमध्ये आपल्या मुलांनी दाखवलेली शिस्त आणि तंत्रशुद्ध कौशल्य कौतुकास्पद आहे. प्रशिक्षक रवी सर आणि रुपाली मॅडम यांनी मुलांवर घेतलेले कष्ट आणि शाळेचे प्रोत्साहन यामुळेच हे उपविजेतेपद शक्य झाले आहे. सर्व विजेत्या बालखेळाडूंचे मनापासून अभिनंदन!
>
> - विपुल कुलकर्णी, पालक

तीन दिवस चाललेल्या या रंगतदार स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये आर. के. एल. गॅलेक्सीच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली:

पदकतालिका: २२ सुवर्ण, १८ रौप्य आणि ७ कांस्यपदकांसह एकूण ४७ पदके.

११ वर्षांखालील गट (मुले व मुली): उत्कृष्ट मैदानी प्रात्यक्षिके आणि शिस्तीच्या जोरावर सुवर्णपदकांची लयलूट केली.


१४ वर्षांखालील गट (मुले व मुली): तंत्रशुद्ध लाठी-काठी कौशल्यांचे शानदार प्रदर्शन करत पदकतक्त्यात वर्चस्व राखले. या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत ठाणे जिल्ह्याने प्रथम क्रमांक (सर्वसाधारण विजेतेपद) पटकावला, तर आर. के. एल. गॅलेक्सी स्कूलच्या जोरावर पिंपरी-चिंचवडने द्वितीय क्रमांक, रायगड जिल्ह्याने तृतीय आणि सोलापूर जिल्ह्याने चतुर्थ क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण असोसिएशनचे अध्यक्ष संतोष चौधरी आणि प्रतिभा चौधरी यांच्या उपस्थितीत पार पडले. ही संपूर्ण स्पर्धा जनरल सेक्रेटरी प्रो. आरती चौधरी यांच्या मुख्य देखरेखीखाली पार पडली.

स्पर्धेचे टेक्निकल नियोजन प्रो. स्वाती मॅगिरी, प्रो. जैद काजी, प्रथमेश म्हात्रे, मानसी पवार, स्मित चौधरी, मंथन पवार, अथर्व नलावडे व १८ पंचांनी पाहिले, तर मीडिया इन्चार्ज म्हणून रोहन पवार व प्रेम पोटे यांनी जबाबदारी सांभाळली. विजेत्या सर्व बालचॅम्पियन्सना प्रशिक्षक रवी सर आणि रुपाली मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या ऐतिहासिक यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षक वृंद आणि पालकांकडून विजेत्या खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे कौतुक होत आहे.

> मुली आणि मुलांनी ११ व १४ वर्षांखालील गटात ४७ पदकांची कमाई करत शाळेचा आणि पिंपरी-चिंचवडचा डंका राज्यभरात वाजवला आहे, याचा एक पालक म्हणून मला खूप आनंद होत आहे. लाठी-काठीसारख्या महाराष्ट्राच्या पारंपरिक खेळांमध्ये मुलांची अशी दैदिप्यमान कामगिरी पाहणे हा एक सुखद अनुभव आहे. या यशाचे सर्व श्रेय विद्यार्थ्यांची मेहनत, प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि शाळा व्यवस्थापनाला जाते.
>
> - वैशाली घुटे, पालक.

# The Power of Learning




Learning is a light that shines,
Guiding us through changing times.
Every book we read each day,
Shows us a brighter, better way.
Knowledge gives us wings to fly,
To chase our dreams across the sky.
With courage, hard work, and a smile,
We can reach our goals mile by mile.
Education is a precious key,
Unlocking all that we can be.
So let us learn and always grow,
For knowledge helps our future glow.

AAYAN PARVEZ SIDDIQUE
Grade VII (Caribbean)
Priyadarshani School, Moshi.

# Winter Rain




Every valley drinks,
Every dell and hollow;
Where the kind rain sinks and sinks,
Green of Spring will follow.
Yet a lapse of weeks,
Buds will burst their edges,
Strip their wool-coats, glue-coats, streaks,
In the woods and hedges;
Weave a bower of love
For birds to meet each other,
Weave a canopy above
Nest and egg and mother.
But for fattening rain
We should have no flowers,
Never a bud or leaf again
But for soaking showers;
Never a mated bird in the rocking tree-tops,Never indeed a flock or herd
To graze upon the lea-crops.Lambs so woolly white,
Sheep the sun-bright leas on,
They could have no grass to bite
But for rain in season.
We should find no moss
In the shadiest places,
Find no waving meadow grass
Pied with broad-eyed daisies;
But miles of barren sand,
With never a son or daughter,
Not a lily on the land,
Or lily on the water.

ARYA RAJENDRA SALUNKE
GRADE V (Section :SPENCER )
PRIYADARSHANI SCHOOL, MOSHI.